भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

**(सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Transfer of Prisoners Act, 1950

**(Act No. 29 of 1950)**

[*As in force on the 6th August, 2006*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

**[किंमत :** रुपये १६.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि ट्रान्सफर ऑफ प्रिझनर्स अ‍ॅक्ट, १९५० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठ ९२ वर प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Transfer of Prisoners Act, 1950 as on the 6th August, 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November, 2006 on pages 92.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

(शा.म.मु.) एच ४१३६ (१०४०—५-०८)

# कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. कैद्यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविणे.

४. निरसन व व्यावृत्ती.

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी-इंग्रजी शब्दसूची

# कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

## (१९५० चा अधिनियम क्रमांक २९)[१]

(६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान )

[१२ एप्रिल, १९५०]

**कारागृहामध्ये बंदिस्त केलेल्या कैद्यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.**

**१.** (१) या अधिनियमास, "कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०" असे म्हणावे.

(२) त्याची व्याप्ती * * * * * [२] संपूर्ण भारतभर आहे.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात,—

(क) "न्यायालय" यात, दिवाणी, फौजदारी किंवा महसुली अधिकारितेचा वैधरीत्या वापर करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

[३][(ख) संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत, "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, त्या संघराज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे ;]

(ग) "कारागृह" यात, राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे जे ठिकाण दुय्यम तुरुंग असल्याचे जाहीर केले असेल अशा कोणत्याही ठिकाणाचा समावेश होतो.

**कैद्यांना एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविणे.**

**३.** (१) जेव्हा एखादी व्यक्ती,—

(क) मृत्यू शिक्षादेशान्वये ; किंवा

(ख) कारावासाच्या किंवा काळ्या पाण्याच्या शिक्षादेशान्वये, किंवा त्याऐवजी ; किंवा

(ग) द्रव्यदंड भरण्यास कसूर केल्यामुळे ; किंवा

(घ) शांतता राखण्यासाठी किंवा चांगली वर्तणूक ठेवण्यासाठी जमानत देण्यात कसूर केल्यामुळे,

एखाद्या राज्यातील एखाद्या कारागृहात बंदिस्त असेल तेव्हा, त्या राज्याचे शासन, कोणत्याही अन्य राज्याच्या शासनाच्या संमतीने, आदेशाद्वारे, त्या कैद्यास त्या कारागृहातून दुसऱ्या राज्यातील कोणत्याही कारागृहात हलविण्याची तरतूद करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीला ज्या कारागृहात हलविण्यात आले असेल त्या कारागृहाचा प्रभारी अधिकारी, अशा व्यक्तीची ज्याद्वारे रवानगी करण्यात आली असेल असा कोणताही रिट, वॉरंट किंवा न्यायालयाचा आदेश यांच्या निकडीनुसार, शक्य असेल तेथवर, अथवा कायद्याच्या रीतसर कार्यवाहीच्या ओघात, अशा व्यक्तीला मुक्त करण्यात येईपर्यंत अथवा हलविले जाईपर्यंत तिला दाखल करून घेईल व स्थानबद्ध करील.

**निरसन व व्यावृत्ती.**

**४.** [१९०० चा अधिनियम तीन, कलम २९ ची सुधारणा] निरसन व विशोधन अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३६) कलम २ व अनुसूची एक द्वारे निरसित करण्यात आला.

---

१. या अधिनियमाचा विस्तार —

१९६१ चा विनियम ७ द्वारे कोहिमा व मोकोकचुंग जिल्ह्यांवर ;

१९६३ चा विनियम ६ द्वारे दादरा व नगर हवेलीवर ;

१९६३ ची अधिसूचना क्र. ४३०, दिनांक ९ मार्च, १९६५, पहा-**भारताचे राजपत्र,** भाग दोन, कलम ३ (झ), इंग्रजी पृष्ठ ४६८ द्वारे गोवा, दमण व दीव वर आणि

१९६८ चा अधिनियम २६, कलम ३ व अनुसूची द्वारे पाँडेचेरीवर करण्यात आला आहे.

२. १९६८ चा अधिनियम, २५, कलम २ व अनुसूची द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून" हे शब्द वगळण्यात आले (१५ ऑगस्ट, १९६८ रोजी व तेव्हापासून).

३. विधी अनुकूलन आदेश (क्र. ३) १९५६ याद्वारे मूळ खंडाऐवजी दाखल केला.

# THE TRANSFER OF PRISONERS ACT, 1950

## कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| administrator | प्रशासक | [section 2 (*b*)] |
| exigency | निकड | [section 3 (*2*)] |
| jurisdiction | अधिकारिता | [section 2 (*a*)] |
| lawfully | वैधरीत्या | [section 2 (*a*)] |
| removal | हलविणे | [section 3 (*1*)] |
| security | जमानत | [section 3 (*1*) (*d*)] |
| sentence of death | मृत्युशिक्षादेश | [section 3 (*1*) (*b*)] |
| subsidiary jail | दुय्यम तुरुंग | [section 2 (*c*)] |
| transfer of prisoner | कैदी स्थानांतरण | [section 1 (*1*)] |

# कैदी स्थानांतरण अधिनियम, १९५०

# THE TRANSFER OF PRISONERS ACT, 1950

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिकारिता | jurisdiction | [कलम २ (क)] |
| कैदी स्थानांतरण | transfer of prisoner | [कलम १ (१)] |
| जमानत | security | [कलम ३ (१) (घ)] |
| दुय्यम तुरुंग | subsidiary jail | [कलम २ (ग)] |
| निकड | exigency | [कलम ३ (२)] |
| प्रशासक | administrator | [कलम २ (ख)] |
| मृत्युशिक्षादेश | sentence of death | [कलम ३ (१) (ख)] |
| वैधरीत्या | lawfully | [कलम २ (क)] |
| हलविणे | removal | [कलम ३ (१)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई